# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १८८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि. २९ नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ११:३० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १८८ वी बैठक **शुक्रवार, दि.२९ नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. नलिनी टेंभेकर<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

अनुपस्थिती:

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. सुशिल कुमार शिंदे, श्री. महादेव धरेप्पा कमळे व डॉ. श्रीमती रंगरेज आयेशा मोहम्मद सादिक यांनी आपली अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०१] | दि. ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.११ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र. ०८ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | अभियांत्रिकी विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | विद्यापीठाकडे सद्यस्थितीत परिसरातील व नवीन परिसरातील कामाकरिता JCB assembly व Hand Operating System सह एक नवीन ट्रॅक्टर खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | विद्यापीठ परिसरातील कामासाठी १ नवीन ट्रॅक्टर खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच नवीन व जुन्या परिसरातील कामाकरिता JCB assembly व Hand Operating Drilling System खरेदी करण्यास ही सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दि.०५ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतातील विषय क्र. ०७ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | आस्थापना विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ड मध्ये कार्यरत शिपाई पदावरील महिला कर्मचारी यांच्याकरिता अग्रीम घेवून गणवेश (ड्रेस व साडी) खरेदी करण्यास समितीने एकमताने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच, सदर समस्येचे कायमस्वरुपी निराकरण होणेसाठी पुढील वर्षीपासून अग्रीम घेवून वर्ग ड मध्ये कार्यरत महिला शिपाई यांना खाकी रंगाची साडी देण्यात यावी असे सर्वानमुते ठरले. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग ड मध्ये कार्यरत शिपाई पदावरील महिला कर्मचारी यांच्याकरिता अग्रीम घेवून गणवेश (ड्रेस व साडी) खरेदी करण्यास समितीने एकमताने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच, सदर समस्येचे कायमस्वरुपी निराकरण होणेसाठी पुढील वर्षीपासून अग्रीम घेवून वर्ग ड मध्ये कार्यरत महिला शिपाई यांना खाकी रंगाची साडी किंवा ड्रेस देण्यात यावा असे सर्वानमुते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०२] | १. दि. २४ मे, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७३ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि. ०७ जून, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७४ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>३. दि. १३ जून, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>४. दि. ०९ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७६ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>५. दि. ११ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>६. दि. १६ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७८ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>७. दि. १९ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>८. दि. २४ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८० व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>९. दि. २७ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८१ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>१०. दि. ०२ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८२ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>११. दि. १६ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८३ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>१२. दि. १० सप्टेबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>१३. दि. १९ सप्टेबर रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८५ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>१४. दि. ०५ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८६ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>१५. दि. ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८७ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |

| ठराव: | १. दि. २४ मे, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७३ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>२. दि. ०७ जून, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७४ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची दुरुस्तीसह सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>३. दि. १३ जून, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची दुरुस्तीसह सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>४. दि. ०९ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७६ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>५. दि. ११ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>६. दि. १६ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७८ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>७. दि. १९ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची दुरुस्तीसह सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>८. दि. २४ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८० व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>९. दि. २७ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८१ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची दुरुस्तीसह सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>१०. दि. ०२ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८२ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>११. दि. १६ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८३ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची दुरुस्तीसह सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>१२. दि. १० सप्टेबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>१३. दि. १९ सप्टेबर रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८५ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>१४. दि. ०५ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८६ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची दुरुस्तीसह सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>१५. दि. ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८७ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली. | |
|---|---|---|

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **विद्यापीठ परिसरात विविध संकुलात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी सहायक प्राध्यापक या पदावर नेमण्यात येणाऱ्या शिक्षकांचा करार पूर्ण ११ महिने करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत श्री. चनसबप्पा गुंडप्पा बंकूर यांनी विषय क्र. २१ प्रमाणे "आपल्या विद्यापीठातील कंत्राटी (Contractual) प्राध्यापकांचे करार हे किमान ११ महिन्यांचे करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे." सदर विषयानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.<br>ठराव: सदरचा प्रस्ताव श्री. चनसबप्पा गुंडप्पा बंकूर यांनी मांडल्यानंतर त्यास ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>याबाबत सादर करण्यात येते की, सध्या प्रस्तुत विद्यापीठ परिसरात एकूण ११ संकुले कार्यरत असून, त्यात ५२ पेक्षा जास्त अभ्यासक्रमाचे अध्ययन व अध्यापन केले जाते. शासनाने एकूण ०५ अनुदानित संकुलांसाठी ०५ प्राध्यापक, १० सहयोगी प्राध्यापक आणि २२ सहायक प्राध्यापक एकूण ३७ शिक्षकीय पदे मंजूर केली आहेत. त्यापैकी सध्या १८ शिक्षक कार्यरत आहेत.<br>नियमित शिक्षकांची अपुरी संख्या व विविध संकुलात विविध अभ्यासक्रमांचा वाढलेला कार्यभार लक्षात घेऊन दरवर्षी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ अन्वये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात एका शैक्षणिक वर्षासाठी जवळ-जवळ १०० पेक्षा जास्त कंत्राटी सहायक प्राध्यापकांची पदे भरली जातात.<br>सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांसंबंधी पारित केलेल्या नवीन शैक्षणिक वर्षाच्या परिपत्रकानुसार कंत्राटी सहायक प्राध्यापक पदांच्या मुलाखतींचे नियोजन करण्यात येते व स्थानिक निवड समितीने शिफारस केल्यानुसार त्यांचे नियुक्ती आदेश पारित करण्यात येतात.<br>सबब, विद्यापीठ परिसरात विविध संकुलात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी सहायक प्राध्यापक या पदावर नेमण्यात येणाऱ्या शिक्षकांचा करार पूर्ण ११ महिने करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ परिसरात विविध संकुलात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी सहायक प्राध्यापक या पदावर नेमण्यात येणाऱ्या शिक्षकांचा कराराची मुदत १० महिने करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[०४]</td><td>

**ॲड. उषा नंदकुमार पवार, अधिसभा सदस्या यांनी मा. कुलगुरु महोदयांना स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र मसुदा समितीवर जादाचे सदस्य नेमणे बाबत पाठविलेले पत्र विचारार्थ.**

टिपणी: श्रीमती ॲड उषा नंदकुमार पवार अधिसभा सदस्या पुअहोसोविसो यांनी दि.०७/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मा. कुलगुरु महोदयांना कळविले आहे की, "स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र" आपल्या विद्यापीठामध्ये मंजूर झालेले असून अद्याप पर्यंत कार्यवाही पूर्ण झालेली नाही सदर समितीमध्ये आणखी जादाचे सदस्य काम करण्यास मनापासून इच्छुक आहेत त्यांची नावे पुढीलप्रमाणे:

<table>
<tr><td>१) लहु नामदेव गायकवाड</td><td>५) श्री. गणेश इंगळे</td><td>८) श्री. हेमंत रामगुडे</td></tr>
<tr><td>२) श्री. पांडुरंग तानाजी घोलप</td><td>६) श्री. महेश देशमुख</td><td>९) श्री. तुषार आवताडे</td></tr>
<tr><td>३) श्री. उत्तम सदाशिव आयवळे</td><td>७) श्री. सचिन बागल</td><td>१०) श्री. महेश भोसले</td></tr>
<tr><td>४) श्री. बालाजी चौगुले</td><td></td><td></td></tr>
</table>

तरी विनंती की, "वरील सर्व १ ते १० सदस्यांची स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र मसुदा समितीवर सदस्य म्हणून निवड करावी", अशी विनंती केली आहे.

याबाबत सादर करण्यात येते की, दि. २८/०७/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १२ अन्वये, ॲड उषा नंदकुमार पवार यांनी विद्यापीठ परिसरात नव्याने बांधण्यात आलेल्या क्रीडा संकुलास "स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल" असे नाव देण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे. सदरचा विषय ॲड उषा नंदकुमार पवारयांनी मांडला. त्यास डॉ. शिरीष नागनाथ भोसले यांनी अनुमोदन दिले. परंतू तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत ॲड उषा नंदकुमार पवार यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली. सभागृहाने एकमताने परवानगी दिली. सदर ठरावावर अनौपचारिक चर्चा करण्यात आली. चर्चेअंती तत्कालीन मा. प्रभारी कुलगुरु महोदयांनी "स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र" सुरु करण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्यात येईल असे सूचित केले होते. त्यानुसार दि. २२/१२/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. ५ वर पारित ठरावानुसार विद्यापीठ परिसरात "स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र" सुरु करण्यासंदर्भात खालील प्रमाणे मसुदा समिती गठीत करण्यात आली आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>नाव</th><th>पद</th></tr>
<tr><td>१)</td><td>श्री. सचिन मारुती गायकवाड</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२)</td><td>ॲड उषा नंदकुमार पवार</td><td>सदस्या</td></tr>
<tr><td>३)</td><td>श्री. संजय नामदेव सांळुखे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४)</td><td>श्रीमती अस्मिता गायकवाड</td><td>सदस्या</td></tr>
<tr><td>५)</td><td>श्री. संभाजी राजे शिंदे</td><td>सदस्य</td></tr>
</table>

सदर समितीची बैठक दि.१८/०१/२०२४ रोजी संपन्न झाली असून, पुढील बैठक मा.अध्यक्षांनी सूचित केल्यानुसार आयोजित करण्यात येणार आहे.

सबब, श्रीमती ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी सुचविल्याप्रमाणे उपरोक्त अनु. क्र. १ ते १० नावे "स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे" अध्यासन केंद्राच्या मसुदा समितीवर सदस्य म्हणून समावेश करावे किंवा कसे? ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**ॲड. उषा नंदकुमार पवार, अधिसभा सदस्या यांनी मा. कुलगुरु महोदयांना स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र मसुदा समितीवर जादाचे सदस्य नेमणेबाबत दि.०७/१०/२०२४ रोजीच्या पत्राची नोंद घेण्यात आली. सदर अध्यासन केंद्राच्या मसुदा समितीवर जादाचे सदस्य नेमणेबाबत समिती अध्यक्ष यांनी निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले.**

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. १६ नोव्हेंबर, २०२२ नुसार प्रस्तुत विद्यापीठातील रिक्त शिक्षक संवर्गापैकी सात (०७) शिक्षक पदभरतीसाठी म.सा.वि. अधिनियम २०१६ कलम १०२ (०२) (ड) नुसार विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील इतक्या विषयतज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषय विषयतज्ञ नामनिर्देशनाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br><br>टिपणी: महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१६६-अ/१७/विशि-१, दि. १६ नोव्हेंबर, २०२२ नुसार प्रस्तुत विद्यापीठास रिक्त शिक्षक संवर्गापैकी सात (०७) शिक्षक पदे भरतीस मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार शासनाच्या प्रचलित शासन निर्णयानुसार शिक्षक संवर्गातील बिंदूनामावलीची मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, पुणे यांचेकडून प्राथमिक तपासणी तर मा. प्रधान सचिव, १६-ब, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून अंतिम तपासणी करुन घेण्यात आली आहे.<br><br>त्यानुसार शासनाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्तुत विद्यापीठातील नियमित अध्यापकांच्या (प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक) रिक्त पदांपैकी सात (०७) पदे भरण्यास दिलेल्या मान्यतेनुसार जाहिरात क्र. PAHSUS/Estab./TP-१/२०२४/२१२ व PAHSUS/ Estab./TP-१/२०२४/२०१३,दि.२४/०७/२०२४ अन्वये स्थानिक वर्तमानपत्र, AIU, इंडियन एक्सप्रेस, दैनिक लोकसत्ता तसेच स्थानिक वर्तमानपत्र आणि विस्तृत जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०२ (२) (ड) नुसार ज्या विषयांसाठी अध्यापकाची निवड करावयाची आहे अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील सहापेक्षा जास्त तज्ञांची यादी प्र. अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा व प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांचेकडून मागविण्यात आली होती. त्यानुसार सदर विषयतज्ज्ञांची यादी दि. ०५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र. ९ अन्वये ठेवला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.<br><br>ठराव: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. १६ नोव्हेंबर, २०२२ नुसार प्रस्तुत विद्यापीठात रिक्त शिक्षक संवर्गापैकी सात (०७) शिक्षक पदभरतीसाठी म.सा.वि. अधिनियम २०१६ कलम १०२ (२) (ड) नुसार विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ञांच्या नामिकेतून खालीलप्रमाणे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले. तसेच सदर विषयतज्ञांमधून एखादा विषयतज्ञ उपलब्ध न झाल्यास उर्वरित नावांमधून पर्यायी नावे घेण्यास मा. कुलगुरु महोदय यांना सर्वाधिकार देण्यात आले. | आस्थापना विभाग |

### Expert List: Journalism and Mass Communication -

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Prof. Punita Harne | Department of Mass Communication, Gujrath Vidyapith, Ahemedabad |
| 2. | Prof. Sonalee Nargunde | Department of Mass Communication, Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore (MP) |
| 3. | Dr. Sunil Deepak Ghodke | Department of Mass Communication, Mahatma Gandhi Central University, TempCamp, Motihari, East Champaran, Bihar |
| 4. | Dr. Rajendra Gonarkar | Department of Mass Communication, SRTM Uni. Nanded |
| 5. | Dr. Rekha Shelke | MGM College of Journalism, N-4, Cidco, Aurangabad |
| 6. | Nisha Pawar | Department of Mass Communication, Shivaji University, Kolhapur |

### Expert List: Applied Electronics

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Dr. Balasaheb J. Nagare | Professor, University of Mumbai, Mumbai |
| 2. | Prof. M. Manikandan | Dept. of Electronics Engg. Anna University, Chennai |
| 3. | Prof. (Dr.) Pushpalatha P. | School of Computer Science, M.G.M. University Kottayam, Kerala |
| 4. | Prof.A.C. Kumbharkhane | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded |
| 5. | Prof. R. L. Raibagkar | Applied Electronics / Materials Sci. Gulbarga University, Gulbarga |
| 6. | Prof. S. D. Sartale | S.P. Pune University, Pune |

### Expert List: Material Science

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Prof. Vaishali Bambole | Prof. & Head, Dept. of Physics, University of Mumbai, |
| 2. | Dr. P. R. Biju | Prof. School of Pure & Applied Physics, Mahatma Gandhi Uni. Kottayam Kerala |
| 3. | Dr. Y. D. Kolekar | Dept. of Physics, S.P. Uni, Pune |
| 4. | Prof.A.C. Kumbharkhane | Materials Sci./Electronics, Swami Ramanand Teerth Marathwada Uni. Nanded |
| 5. | Prof. Pravin S. More | Materials Science, Homi Bhabha State University, Mumbai |
| 6. | Dr. V. L. Mathe | Dept. of Physics, S. P. University, Pune |

**Expert List: Mathematics**

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Prof. Dr. D. D. Pawar | School of Mathematical Sciences, SRTM University, Nanded |
| 2. | Prof. S. D. Kendre | Savitribai Phule Pune University, Pune |
| 3. | Prof. Shahaji Pawar | North Maharashtra University, Jalgaon |
| 4. | Prof. Sadik Shaikh | Maulana Azad College, Chhatrapati Sambhaji Nagar |
| 5. | Prof. Satish Panchal | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhaji Nagar |
| 6. | Dr. S. N. Gaikwad | Senior Professor, Dept. of Mathematics, Gulbarga Uni. Kalburagi |

**Expert List: Geoinformatics**

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Prof. Dr. Navendu Avinash Chaudhary | Symbiosis Institute of Geoinformatics, Pune |
| 2. | Prof. Dr. Ravindra Gahininath Jaybhaye | Dept. of Geography, S.P. Pune Uni. Pune |
| 3. | Prof. Dr. Parag Khadke | Professor & Dean Humanity, School of Earth Sci. SRTM Uni. Nanded |
| 4. | Prof. Dr. Sambhaji Dnyaneshwar Shinde | Dept. of Geography, Shivaji University, Kolhapur |
| 5. | Dr. (Ms) Sulochana Shekhar | Dept. of Geography, School of Earth Sci. Central Uni. of Tamil Nadu, Neelakudi Village, Kangalancherry Po. Thiruvarur |
| 6. | Prof. Pardeshi S. F. | Dept. of Geography, S.P. Pune Uni. Pune |

**Expert List: Polymer Chemistry**

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Prof. Mishra Satyndra | B 5403, Cleo County, Sector 121, Gautam Budhha Nagar, Nodea 201316 (UP) |
| 2. | Prof. Roli Purwar | Delhi Technological University, Delhi |
| 3. | Dr. Manohar Badigar | Emeritus Scientist Polymer Division NCL, Pune |
| 4. | Prof. D. D. Kale | Ex HOD, ICT, Mumbai |
| 5. | Prof. Saboo Thomas | Ex-VC, MGM Uni. Kottayam, Kerala |
| 6. | Dr. Virendra Kumar | Chemical Sciences, Homi Bhaha National Institute, Mumbai |

**Expert List: Industrial Chemistry**

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Prof. Bhange | ICT, Mumbai |
| 2. | Dr. Archanamoni Das | CSIR – North East Institute of Science and Techlology, Jorhat 785006 (Asam) |
| 3. | Prof. Garje S. S. | Dept. of Chemistry, Mumbai University, Mumbai |

| | | | |
|---|---|---|---|
| | 4. | Prof. Santosh Haram | Dept. of Chemistry, Savitribai Phule Pune University, Pune |
| | 5. | Prof. Suresh Balasaheb Waghmode | Dept. of Chemistry, Savitribai Phule Pune University, Pune |
| | 6. | Prof. Makone Sangita S. | Professor, Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded |

**Expert List: Statistics**

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Prof. D. T. Shirke | Shivaji University, Kolhapur |
| 2. | Prof. S. P. Gite | Mumbai University, Mumbai |
| 3. | Prof. S. B. Munoli | Karnataka University, Dharwad |
| 4. | Prof. Sujatha Iginshetty | Gulbarga University, Kalburagi |
| 5. | Prof. A. S. Talwar | Karnataka University, Dharwad |
| 6. | Dr. S. V. Kawale | Head, Dept. of Statistics, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhaji Nagar |

सबब, उपरोक्त Journalism & Mass Communication, Applied Electronics, Materials Science, Mathematics, Geoinformatics, Polymer Chemistry, Industrial Chemistry आणि Statistics या विषयातील म. सा. वि. अधिनियम २०१६ कलम १०२(२)(ड) अन्वये विशेष ज्ञान असलेल्या विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील इतक्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषयतज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव: **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. १६ नोव्हेंबर, २०२२ नुसार प्रस्तुत विद्यापीठातील रिक्त शिक्षक संवर्गापैकी सात (०७) शिक्षक पदभरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (०२) (ड) अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा विषयतज्ञांच्या नामिकेतून खालील तीन विषय तज्ञांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

**Expert List: Journalism and Mass Communication -**

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Prof. Punita Harne | Department of Mass Communication, Gujrath Vidyapith, Ahemedabad |
| 2. | Dr. Rajendra Gonarkar | Department of Mass Communication, SRTM Uni. Nanded |
| 3. | Nisha Pawar | Department of Mass Communication, Shivaji University, Kolhapur |

**Expert List: Applied Electronics**

| Sr. No. | Name | Address |
|---|---|---|
| 1. | Dr. Balasaheb J. Nagare | Professor, University of Mumbai, Mumbai |
| 2. | Prof. M. Manikandan | Dept. of Electronics Engg. Anna University, Chennai |
| 3. | Prof. S. D. Sartale | S.P. Pune University, Pune |

| Expert List: Material Science | | |
|---|---|---|
| Sr. No. | Name | Address |
| 1. | Prof. Vaishali Bambole | Prof. & Head, Dept. of Physics, University of Mumbai, |
| 2. | Dr. P. R. Biju | Prof. School of Pure & Applied Physics, Mahatma Gandhi Uni. Kottayam Kerala |
| 3. | Prof. Pravin S. More | Materials Science, Homi Bhabha State University, Mumbai |
| **Expert List: Mathematics** | | |
| Sr. No. | Name | Address |
| 1. | Prof. Dr. D. D. Pawar | School of Mathematical Sciences, SRTM University, Nanded |
| 2. | Prof. Shahaji Pawar | North Maharashtra University, Jalgaon |
| 3. | Dr. S. N. Gaikwad | Senior Professor, Dept. of Mathematics, Gulbarga Uni. Kalburagi |
| **Expert List: Geoinformatics** | | |
| Sr. No. | Name | Address |
| 1. | Prof. Dr. Navendu Avinash Chaudhary | Symbiosis Institute of Geoinformatics, Pune |
| 2. | Prof. Dr. Sambhaji Dnyaneshwar Shinde | Dept. of Geography, Shivaji University, Kolhapur |
| 3. | Dr. (Ms) Sulochana Shekhar | Dept. of Geography, School of Earth Sci. Central Uni. of Tamil Nadu, Neelakudi Village, Kangalancherry Po. Thiruvarur |
| **Expert List: Polymer Chemistry** | | |
| Sr. No. | Name | Address |
| 1. | Prof. Mishra Satyndra | B 5403, Cleo County, Sector 121, Gautam Budhha Nagar, Nodea 201316 (UP) |
| 2. | Prof. Roli Purwar | Delhi Technological University, Delhi |
| 3. | Dr. Manohar Badigar | Emeritus Scientist Polymer Division NCL, Pune |
| **Expert List: Industrial Chemistry** | | |
| Sr. No. | Name | Address |
| 1. | Prof. Bhange B. M. | ICT, Mumbai |
| 2. | Dr. Archanamoni Das | CSIR – North East Institute of Science and Techlology, Jorhat 785006 (Asam) |
| 3. | Prof. Makone Sangita S. | Professor, Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded |
| **Expert List: Statistics** | | |
| Sr. No. | Name | Address |
| 1. | Prof. D. T. Shirke | Shivaji University, Kolhapur |
| 2. | Prof. S. P. Gite | Mumbai University, Mumbai |
| 3. | Prof. S. B. Munoli | Karnataka University, Dharwad |

तसेच सदर विषयतज्ञांमधून एखादा विषयतज्ञ उपलब्ध न झाल्यास उर्वरित नावांमधून पर्यायी नावे घेण्यास मा. कुलगुरुमहोदय यांना सर्वाधिकार देण्यात आले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०६] | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/ कार्यशाळा आयोजिनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०९/१०/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातंर्गत सर्व संलग्नित महाविद्यालये व संकुलाकडून आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय /राज्य/विभागीय व विद्यापीठ पातळीवर अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र, कार्यशाळा व परिषदा आयोजनाकरिता प्रतिवर्षी प्रस्ताव मागविण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आंतरराष्ट्रीय/ राष्ट्रीय/राज्य व विभागीय पातळीवर चर्चासत्र, कार्यशाळा, परिषद (Seminar, Workshop & Conference) आयोजनाबाबत व त्याकरिता होणाऱ्या खर्चापोटी विद्यापीठ नियमानुसार काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान रक्कम देणेकरिता विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो /अमंवि/ २०२४/४५२१, दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व संकुलाकडून विहित मुदतीत दि.१२/०७/२०२४ पर्यंत दिलेल्या नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार विहित मुदतीत ८८ प्रस्ताव व मुदतीनंतर ०४ प्रस्ताव असे एकूण ९२ प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाले आहेत.<br>उपरोक्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी पात्र महाविद्यालये व संकुलाना अनुदान सहाय्य रक्कम आदा करण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांनी अभ्यासमंडळे विभागाच्या दि.०२/०८/२०२४ रोजीच्या टिपणीवर नामनिर्देशन केल्यानुसार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची बैठक दि.०९/१०/२०२४ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.<br>उपरोक्त समितीने एकूण ९२ प्रस्तावांची छाननी/पडताळणी केली असता त्यापैकी २६ पात्र प्रस्तावांना आर्थिक सहाय्य रक्कम देण्याकरिता शिफारस केलेली असून ६६ प्रस्ताव अनुदान सहाय्य देणेसाठी अपात्र करुन यादी कार्यालयास सादर केली आहे. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत मा. व्यवस्थापन परिषदेच्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडला आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०९/१०/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | अभ्यासमंडळे विभाग |
| ठराव: | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र / कार्यशाळा आयोजिनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०९/१०/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ (AIU) आयोजित विविध स्पर्धेकरिता सहभागी होणारे खेळाडू, संघ प्रशिक्षक, संघव्यवस्थापक यांचे प्रवासाकरिता रेल्वे आरक्षणाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे संघ दरवर्षी विद्यापीठाकडून क्रीडा महोत्सव, आंतर विद्यापीठ/वेस्ट झोन /साऊथ वेस्ट झोन/ खेलो इंडिया आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होत असतात. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या दि.१७/०८/२०२४रोजीच्या बैठकीतील आयत्या वेळेच्या विषयातील ठराव क्र.०८ (४) मध्ये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.<br>अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ (AIU) आयोजित विविध क्रीडा स्पर्धेकरिता प्रस्तुत विद्यापीठाचे संघ सहभागी होणारे खेळाडू, संघप्रशिक्षक, संघव्यवस्थापक यांचे प्रवासाकरिता रेल्वे तिकीट आरक्षण करण्याकरिता मान्यता प्राप्त एजन्सी नेमण्याची प्रक्रिया करुन सदर एजन्सीकडून रेल्वे तिकीट आरक्षण करण्याचे ठरले. तसेच विद्यापीठातील सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना विद्यापीठ संबंधित कामासाठी परगावी जाण्यासाठी रेल्वे तिकीट आरक्षणाकरिता मान्यताप्राप्त एजन्सी नेमण्याची प्रक्रिया राबविण्याबाबत मा. कुलगुरु महोदयांनी सुचविले आहे. सदर विषय व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>उक्त विषयाच्या अनुषंगाने स्थानिक बाजार पेठेतून चौकशी केली असता अंदाजे रु.१,०००/- टिकीटाकरिता १५ टक्के कमीशन रक्कम आकारण्यात येते असे कळविले आहे. प्रस्तुत विद्यापीठामार्फत विविध क्रीडा स्पर्धेचे मुले व मुलींचे संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ, वेस्ट झोन व साऊथ वेस्ट झोन, खेलो इंडिया आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेकरिता अंदाजे ६० संघ सहभागी होत असतात. सदर स्पर्धाकरिता अंदाजे ५५० खेळाडू आणि अंदाजे १२० प्रशिक्षक, व्यवस्थापक सहभागी होत असतात. सद्य:स्थितीत खेळाडूंकरिता रेल्वे कन्सेशन बंद आहे. तरी एजन्सीमार्फत रेल्वेचे टिकट आरक्षण केल्यास अंदाजे १५ टक्के प्रमाणे रक्कम एजन्सी यांना द्यावे लागणार असून सदर आर्थिक भार विद्यापीठावर पडणार आहे.<br>सबब, अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ (AIU) आयोजित विविध क्रीडा स्पर्धेकरिता सहभागी होणारे खेळाडू, संघ प्रशिक्षक, संघव्यवस्थापक यांचे प्रवासाकरिता रेल्वे आरक्षणाची बाब विचारार्थ | क्रिडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ (AIU) आयोजित विविध स्पर्धेकरिता सहभागी होणारे खेळाडू, संघ प्रशिक्षक, संघव्यवस्थापक यांच्या प्रवासाकरिता रेल्वे आरक्षण मिळवून देण्यासाठी इच्छुक एजन्सीकडून प्रस्ताव (expression of interest) मागवून घेण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०८ ] | अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ (AIU) आयोजित विविध क्रीडा स्पर्धेकरिता क्रिडा स्पर्धेचा स्तर, स्पर्धेचा अतिदुर्गम ठिकाणी जाण्याकरिता प्रवासाबाबत विचारार्थ.<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे संघ दरवर्षी विद्यापीठाकडून आंतर विद्यापीठ, वेस्ट झोन आंतर विद्यापीठ, साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ, खेलो इंडिया क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होत असतात. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या दि.१७/०८/२०२४ रोजीच्या बैठकीतील आयत्या वेळेच्या विषयातील ठराव क्र. ०८ (३) मध्ये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.<br>अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ (AIU) आयोजित क्रीडा स्पर्धेचा स्तर, स्पर्धेचा अतिदुर्गम ठिकाणी जाण्यासाठी विमानाने प्रवास करण्यास मान्यता देण्यात आली असून सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठेवण्याबाबत सर्वानुमते ठरले.<br>सबब, अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ (AIU) आयोजित विविध क्रीडा स्पर्धेकरिता क्रीडा स्पर्धेचा स्तर, स्पर्धेचा अतिदुर्गम ठिकाणी जाण्याकरिता प्रवासाबाबत विचारार्थ सादर. | क्रिडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ (AIU) आयोजित विविध क्रीडा स्पर्धेकरिता क्रिडा स्पर्धेचा स्तर, स्पर्धेचे अतिदुर्गम ठिकाण व त्या त्या वेळीची परिस्थिती पाहून स्पर्धेवेळी विमानाने प्रवास करण्यास परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्याचे सर्वाधिकार मा.कुलगुरु महोदय यांना देण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[०९]</td><td>लोकप्रिय कविवर्य पुरस्कार योजना सुरु करणेबाबत समितीने दिलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी: विविध साहित्य प्रकाराकरिता लोकप्रिय कविवर्य पुरस्कार सुरु करण्याबाबत गठित समितीची बैठक दि. २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेले आहेत.<br>१. दि. १०/०७/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे साहित्याच्या पुरस्काराचे "छत्रपती शंभूराजे साहित्य पुरस्कार" हे शीर्षक कायम ठेवण्याचे ठरले.<br>२. सदरील पुरस्कार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विविध संकुले तसेच विद्यापीठीय प्रशासनातील आणि संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यापैकी प्रत्येकी एकास दरवर्षी हा पुरस्कार दिला जाईल.<br>३. सदर पुरस्कारासाठी जाहीर प्रकटन देऊन ०१ जानेवारी ते ३१ डिसेंबर या मागील वर्षाच्या कालावधीतील विविध कलाकृतीच्या प्रवेशिका मागवण्यात याव्यात.<br>४. सदर पुरस्कारासाठी साहित्याच्या प्रकारचे (कथा, कविता, कादंबरी इ.) कोणतेही बंधन नसेल.<br>५. हा पुरस्कार मराठी भाषेतील साहित्यासाठी दिला जावा.<br>६. पुरस्काराचे स्वरुप हे सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि शॉल असे असावे.<br>७. हे पुरस्कार मराठी भाषा दिनानिमित्त स्वतंत्र कार्यक्रम घेवून वितरित करण्यात यावेत.<br>८. पुरस्कार निवड समिती खालीलप्रमाणे असावी.<br><table><tr><td>अध्यक्ष</td><td>अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा</td></tr><tr><td>सदस्य</td><td>व्यवस्थापन परिषदेतील कुलगुरु नामनिर्देशित एक सदस्य</td></tr><tr><td>सदस्य</td><td>मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष</td></tr><tr><td>सदस्य</td><td>कुलगुरु नामनिर्देशित एक तज्ज्ञ साहित्यिक</td></tr><tr><td>सदस्य</td><td>संचालक, भाषा व वाङ्‌मय संकुल</td></tr><tr><td>सदस्य सचिव</td><td>संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग</td></tr></table>तरी वरीलप्रमाणे लोकप्रिय कविवर्य पुरस्कार योजना सुरु करण्याकरिता झालेल्या समितीच्या बैठकीतील अहवाल स्विकारुन पुढील कार्यवाही करण्यास सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.</td><td>विद्यार्थी विकास विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>लोकप्रिय कविवर्य पुरस्कार योजना सुरु करणेबाबत समितीने दिलेला अहवाल सर्वानुमते स्विकारण्यात आला. मात्र अहवालातील ठराव क्र. २ व ७ मध्ये सर्वानुमते खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.<br>२. सदरील पुरस्कार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी आणि विद्यार्थी अशा तीन प्रवर्गातून दरवर्षी देण्यात यावा.<br>७. हे पुरस्कार दि.२७ फेब्रुवारी या “मराठी भाषा गौरव दिन” या दिवशीच्या कार्यक्रमात वितरित करण्यात यावेत.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१०] | **दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र. २२ अन्वये, विद्यापीठातील पदवीदान (convocation) समारंभात पूर्वी सन्मानाने वापरले जाणारे बाराबंदी पोशाख पुन्हा सुरु करणेबाबतची अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषेदच्या विचारार्थ.**<br>टिपणी: दि.२४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभा बैठकीमध्ये ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी खालील प्रस्ताव मांडला.<br>"आपल्या विद्यापीठातील पदवीदान (convocation) समारंभात पूर्वी सन्मानाने वापरला जाणारे बाराबंदी पोशाख पुन्हा सुरु करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे"<br>सदर प्रस्तावास ठरावास अनुसरुन विषय क्र. २२ नुसार अधिसभेने पुढील प्रमाणे ठराव पारित केला आहे.<br>"सदरचा प्रस्ताव ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सचिन मारुती गायकवाड व डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."<br>त्यानुसार वरील ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर करणे आवश्यक आहे.<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या पदग्रहण सोहळ्यात बाराबंदीचा वापर होत आहे. हा पोषाख श्री "सिद्धेश्वर" महायात्रेशिवाय कोणीही कधीही परिधान करु नये, असा निर्णय श्री राजशेखर हिरेहब्बु, यात्रेचे मानकरी, नंदीध्वज धारक व भक्तगण यांच्या बैठकीत करण्यात आला आहे, हा पोषाख परिधान करु नये याबाबत ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर महायात्रेचे प्रमुख व पहिल्या नंदीध्वजाचे मानकरी (पुजारी) श्री. राजशेखर हिरेहब्बु यांची मागणी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आली होती. याबाबत निर्णय घेण्यासाठी दि. १७/१०/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. ७ अन्वये खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली होती.<br>१) प्रा. देवानंद चिलवंत — अध्यक्ष<br>२) डॉ. लक्ष्मीकांत दामा — प्र-कुलगुरु तथा सदस्य<br>३) डॉ. वसंत कोरे — सदस्य<br>४) डॉ. राजशेखर हिरेमठ — सदस्य<br>सदर समितीने श्री सिध्देश्वर मंदिर समिती समवेत बैठक घेवून तो अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले होते. त्याअनुषंगाने गठित करण्यात आलेल्या समितीने श्री सिध्देश्वर मंदिर समिती समवेत बैठक घेतली. त्यात बाराबंदी पुरुषांनी वापरावे असे सांगितले त्यामुळे सदर समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने अंतिम निर्णय घेण्यासाठी समितीमध्ये योगिनी घारे, कुलसचिव तथा निमंत्रित सदस्य व डॉ.माया पाटील, सहा. प्राध्यापक, पुअहोसोविसो तथा निमंत्रित सदस्य व डॉ. ए. एस. लावंड, सहा. प्राध्यापक, पुअहोसोविसो तथा निमंत्रित सदस्य यांचे नामनिर्देशन झाले व सदर समितीची प्रथम | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |

| | |
|---|---|
| | बैठक मा. प्र कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि. १ जानेवारी, २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सदस्य यांच्या समवेत संपन्न झाली व अंतिम निर्णय घेण्यासाठी द्वितीय बैठक दि. ८ जानेवारी, २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता संपन्न झाली व सदर समिती अध्यक्षांनी व सदस्यांनी चर्चा करुन दीक्षांत समारंभाच्या बाराबंदी पोशाखाबाबत खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.<br>दीक्षांत समारंभाच्या बाराबंदी पोशाखा संदर्भातील गठित समितीचा अहवालाची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात बाराबंदी पोषाख परिधान करु नये, ही ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर महायात्रेचे प्रमुख व पहिल्या नंदीध्वजाचे मानकरी (पुजारी) श्री. राजशेखर हिरेहब्बु यांची मागणी बाबत दि. १७/१०/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. ७ अन्वये गठित समितीचा दि. १२/१/२०२४ रोजी प्राप्त अहवाल दि.१६ जानेवारी, २०२४ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता सदरील बैठकीमध्ये ठराव क्र. २ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित झाला आहे.<br>"समितीच्या शिफारशी स्विकारण्यात आल्या तसेच सदर शिफारशींमध्ये विद्यापीठ प्रशासनास काही बदल आवश्यक असल्यास त्या बद्दलचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्याचे सर्वानुमते ठरले. " ठरावाच्या अनुषंगाने दीक्षांत समारंभात उपरणे वापरण्यात येत आहे.<br>ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी खालील प्रस्ताव मांडला.<br>"आपल्या विद्यापीठातील पदवीदान (convocation) समारंभात पूर्वी सन्मानाने वापरला जाणारे बाराबंदी पोशाख पुन्हा सुरु करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे"<br>सदर ठरावास अनुसरुन विषय क्र. २२ नूसार दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.<br>सदरचा प्रस्ताव ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सचिन मारुती गायकवाड व डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, आपल्या विद्यापीठातील पदवीदान (Convocation) समारंभात पूर्वी सन्मानाने वापरले जाणारे बाराबंदी पोशाख पुन्हा सुरु करण्यात यावे अशी दि. २४ सप्टेंबर,२०२४ रोजीच्या अधिसभेचा पढील ठराव "सदरचा प्रस्ताव ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सचिन मारुती गायकवाड व डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली".<br>सबब, सदरील ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| ठराव: | **दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र. २२ अन्वये, विद्यापीठातील पदवीदान (convocation) समारंभात पूर्वी सन्मानाने वापरले जाणारे बाराबंदी पोशाख पुन्हा सुरु करणेबाबतची अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना काही प्रमाणात आर्थिक मदत देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुल व विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड होते. सदर खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होत असतात त्याअनुषंगाने क्रिडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या दि. ११/११/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये उक्त विषयाच्या अनुषंगाने आयत्या वेळेचा विषय घेण्यात आला होता. सदर आयत्या वेळच्या विषयातील विषय क्र. ०५ (१) मध्ये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.<br>ठराव: आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ संकुलातील व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना पत्रव्यवहार करुन खेळाडूंची माहिती घेणे व तसेच खेळाडू कोणत्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. त्याला किती खर्च येणार आहे आणि संबंधित खेळाडू शिकत असलेल्या महाविद्यालयाने किती आर्थिक मदत केली आहे ते पाहून विद्यापीठाच्या फंडातून काही आर्थिक मदत देण्यास मान्यतेसाठी सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठेवण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.<br>सबब, क्रिडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या दि. ११/११/२०२४ रोजीच्या बैठकीतील आयत्या वेळचा विषय क्र. ०५ (१) झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना विद्यापीठाकडून काही प्रमाणात आर्थिक मदत करण्यासाठी तरतूद करणेकामी सदरील विषयाचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | क्रिडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना काही प्रमाणात आर्थिक मदत करण्याबाबत दि.११/११/२०२४ रोजीच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या बैठकीत विषय क्र.५(१) वर झालेला ठराव सर्वानुमते स्विकारण्यात आला. शै. वर्ष २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये १० लाखाची तरतूद करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.**<br>**तसेच याबाबत खेळाडूंचे अर्ज आल्यास याकामी निधी मंजूर करण्याचे सर्वाधिकार मा.कुलगुरु महोदय यांना देण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | प्रस्तुत विद्यापीठातील आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवात तसेच इंद्रधनुष्य विद्यापीठस्तरीय युवा महोत्सव व पश्चिम विभागीय तसेच राष्ट्रीय युवा महोत्सव कार्यक्रमांमध्ये साथ संगत करणारे वादक, गायक, प्रशिक्षक यांचे दि.३०/११/२०२२ रोजीच्या बैठकीत ठरविण्यात आलेल्या मानधनाच्या प्रति दिन प्रमाणे दरात, वाढती महागाई विचारात घेता रु.३००/- इतकी वाढ करण्याबाबत विद्यार्थी विकास समितीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ<br>टिपणी: दि.२३ सप्टेबर २०२४ रोजीच्या विद्यार्थी विकास समितीच्या बैठकीतील विषय क्रमांक ०५ अन्वये खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.<br>"विद्यापीठस्तरीय युवा महोत्सव, इंद्रधनुष्य व पश्चिम विभागीय तसेच राष्ट्रीय युवा महोत्सव कार्यक्रमांमध्ये साथ संगत करणारे वादक, गायक, प्रशिक्षक यांचे प्रति दिन प्रमाणे आज रोजी आसलेले मानधनाच्या रककमेत वाढ करण्याची बाब समितीच्या विचारार्थ." त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.<br>ठराव: प्रस्तुत विद्यापीठातील आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवात तसेच इंद्रधनुष्य विद्यापीठस्तरीय युवा महोत्सव व पश्चिम विभागीय तसेच राष्ट्रीय युवा महोत्सव कार्यक्रमांमध्ये साथ संगत करणारे वादक, गायक, प्रशिक्षक यांचे दि.३०/११/२०२२ रोजीच्या बैठकीत ठरविण्यात आलेल्या मानधनाच्या प्रति दिन प्रमाणे दरात, वाढती महागाई विचारात घेता रु.३००/- इतकी वाढ करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर करण्याची सर्वानुमते शिफारस करण्यात आली.<br>तरी उपरोक्त ठरावानुसार आंतर महाविद्यालयीन, इंद्रधनुष्य विद्यापीठस्तरीय, पश्चिम विभागीय तसेच राष्ट्रीय युवा महोत्सव कार्यक्रमांमध्ये साथ संगत करणारे वादक, गायक, प्रशिक्षक यांचे दि.३०/११/२०२२ रोजीच्या बैठकीत ठरविण्यात आलेल्या मानधनाच्या प्रतिदिन प्रमाणे दरात वाढती महागाई विचारात घेता रु.३००/- इतकी वाढ करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठातील आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवात तसेच इंद्रधनुष्य विद्यापीठस्तरीय युवा महोत्सव व पश्चिम विभागीय तसेच राष्ट्रीय युवा महोत्सव कार्यक्रमांमध्ये साथ संगत करणारे वादक, गायक, प्रशिक्षक यांचे मानधनामध्ये प्रति दिन प्रमाणे दरात, वाढती महागाई विचारात घेता, दि.३०/११/२०२२ रोजीच्या विद्यार्थी व विकास समितीच्या बैठकीत विषय क्र.५ वर झालेला ठराव विचारात घेता, रु.२००/- इतकी वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यात आला असून सदर योजनेमध्ये विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ<br>टिपणी: दि.२४ सप्टेबर २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील विषय क्रमांक १६ अन्वये खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.<br>"विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यात आला असून सदर योजनेमध्ये विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्यात यावा, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे." त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.<br>सदरचा प्रस्ताव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>तरी उपरोक्त ठरावानुसार विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यात आला असून सदर योजनेमध्ये विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यात आला असून सदर योजनेमध्ये विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्याबाबत दि.२४ सप्टेबर २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र. १६ अन्वये केलेली शिफारस ही अपघाती विमा नियमावलीमध्ये बसत नसल्याने सर्वानुमते अमान्य करण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १४ ] | **दि.१९ जुलै, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील ठराव क्र. ३ व २० नुसार विद्यापीठाच्या विविध रोख रक्कमेचे पुरस्कार व सुवर्ण पदके या पारितोषकांच्या अनुषंगाने सर्वंकष अभ्यास करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: अभ्यासमंडळे विभागाकडून दि.१९ जुलै, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसाठी विषय क्र. ३ व २० ठेवला असता, करण्यात आलेल्या ठरावानुसार विद्यापीठ वर्धापन दिनी दिले जाणारे रोख रकमेची ०७ पारितोषिके हे विद्यापीठ वर्धापन दिनाऐवजी दीक्षांत समारंभामध्ये देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. विद्यापीठाकडून रोख रक्कमेच्या स्वरुपात दिली जाणारी पारितोषिके व सुवर्ण पदके यांच्या अनुषंगाने सर्वंकष अभ्यास करण्यासाठी ३ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली. व्यवस्थापन परिषदेकडून गठीत करण्यात आलेल्या ३ सदस्यीय समितीची बैठक दि.३०/०८/२०२४, ३१/०८/२०२४ आणि १०/१०/२०२४ रोजी विद्यापीठ कार्यालयामध्ये संपन्न झाली. सदर समितीने रोख रक्कमेच्या व सुवर्णपदके या पारितोषीकांच्या अनुषंगाने सर्वंकष अभ्यास करुन अभ्यासमंडळे विभागाकडे आपला अहवाल सादर केला आहे. सदरचा अहवाल सोबत जोडला असुन हा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर.<br>सबब, दि.१९ जुलै, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील ठराव क्र.३ व २० नुसार विद्यापीठाच्या विविध रोख रकमेचे पुरस्कार व सुवर्ण पदके या पारितोषीकांच्या अनुषंगाने सर्वंकष अभ्यास करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | अभ्यासमंडळे विभाग |
| ठराव: | **दि.१९ जुलै, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील ठराव क्र.३ व २० नुसार विद्यापीठाच्या विविध रोख रक्कमेचे पुरस्कार व सुवर्ण पदके या पारितोषकांच्या अनुषंगाने सर्वंकष अभ्यास करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**मात्र, सुवर्ण पदकांसाठी प्राप्त सर्व निधी एकत्रित करावा व यापूर्वी सुवर्णपदकासाठी देणगी दिलेल्या देणगीदारांना अधिकची रक्कम देण्याबाबत विनंती पत्र देण्यात यावेत असे ही सर्वानुमते ठरले.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(१)] | **महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. गणवेश-२०२४/ प्र.क्र.६७/जपुक(२९), दि. १० ऑक्टोंबर, २०२४ अन्वये राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गामधील कर्मचाऱ्यांच्या गणवेशाचे शिलाई भत्ता दरात व धुलाई भत्ता दरात सुधारण केल्याने, सदर शासन निणर्यातील अटीच्या अधिन राहून विद्यापीठातील चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना दरमहा रु.२५०/- याप्रमाणे धुलाई भत्ता आदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.** | आस्थापना विभाग |

टिपणी: उक्त शासन निर्णयान्वये राज्य शासकीय संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या शिलाई दारात सुधारण करणे, महिला कर्मचाऱ्यांच्या ब्लाऊजचे शिलाई दर वाढविणे, गणवेश धुलाई भत्ता दरात सुधारणा करणे तसेच गरम कपडयाच्या गणवेशाच्या शिलाई दरात खालीलप्रमाणे वाढ करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर दर सुधारित केल्यामुळे येणारा वाढीव खर्च संबंधित विभाग/कार्यालयाने त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावा. तसेच सदर सुधारीत दर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अमंलात येतील असे नमूद केले आहे.

| बाब | कालावधी | शा.नि.दि.२६/०३/२००८ नुसार दर | सुधारीत दर |
|---|---|---|---|
| शर्ट पँट शिलाई दर | दोन वर्षातून एकदा | रु.२५०/- प्रत्येक जोडीसाठी (एक शर्ट व एक पँट) | रु.७५०/- प्रत्येक जोडीसाठी (एक शर्ट व एक पँट) |
| ब्लाऊजचा शिलाई दर | दोन वर्षातून एकदा | रु.५०/- प्रत्येक ब्लाऊजसाठी | रु.२५०/- प्रत्येक ब्लाऊजसाठी |
| लोकरीचा गणवेश शिलाई दर | चार वर्षातून एकदा | रु.३५०/- | रु.१५००/- |
| धुलाई भत्ता | दर महा | रु.५०/- | रु.२५०/- |

याबाबत सादर करण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग चार संवर्गात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रस्तुत विद्यापीठाकडून दरवर्षी दोन गणवेश शिलाईसह देण्यात येत आहे. तसेच दि.२६ मार्च, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग चार मधील कर्मचाऱ्यांना दरमहा रु.५०/- इतकी रक्कम धुलाई भत्ता शासनाकडून वेतनासोबत आदा करण्यात येत आहे. परंतू उपरोक्त दि.१०/१०/२०२४ शासन निर्णयान्वये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी माहे आक्टोंबर, २०२४ पासून धुलाई भत्ता दरात वरीलप्रमाणे सुधारणा केल्याने, प्रस्तुत विद्यापीठातील चतुर्थश्रेणी संवर्गामधील कर्मचाऱ्यांना माहे आक्टोंबर, २०२४ पासून धुलाई भत्ता रु.२५०/- याप्रमाणे आदा करावी लागणार आहे.

सबब, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. गणवेश-२०२४/प्र.क्र.६७/जपुक(२९), दि. १० ऑक्टोंबर, २०२४ अन्वये राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गामधील कर्मचाऱ्यांच्या गणवेशाचे शिलाई भत्ता दरात व धुलाई भत्ता दरात सुधारण केल्याने, सदर शासन निणर्यातील अटीच्या अधिन राहून विद्यापीठातील चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना दरमहा रु.२५०/- याप्रमाणे धुलाई भत्ता आदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

ठराव: **राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गामधील कर्मचाऱ्यांच्या गणवेशाचे शिलाई भत्ता दरात व धुलाई भत्ता दरात सुधारणा करणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. गणवेश-२०२४/ प्र.क्र.६७/जपुक(२९), दि.१० ऑक्टोंबर, २०२४ ची नोंद घेण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(२)] | **प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) डॅशबोर्ड माहिती व्यवस्थापन (MIS) सॉफ्टवेअर तयार करणेबाबत गठीत तांत्रिक समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांच्या अनुषंगाने MIS सॉफ्टवेअर तयार करण्यासाठी सल्लागार सेवा (Consultancy) स्वरुपात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याशी सामंजस्य करार (MoU) करणे व त्यासाठी होणाऱ्या प्रत्यक्ष खर्च विद्यापीठाच्या अंदाजपत्रकामधुन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रधान मंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठाने शासनास प्रस्ताव सादर केला होता. सदरचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर झाला असून, प्रस्तावानुसार Construction, Renovation and Upgradation, Equipments आणि Soft Component अंतर्गत विविध कामे सुरु झाली आहेत. पीएम-उषा संदर्भातील सर्व कामांचे दस्तऐवजीकरण हे माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) द्वारे डिजिटल स्वरुपात जतन करण्यासंदर्भात रुसा कार्यालय, मुंबई यांनी सूचित केले आहे.<br>दि. १७/१०/२०२४ रोजीच्या पीएम-उषा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ विभागाच्या टिपणीन्वये उक्त सॉफ्टवेअर तयार करण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांनी तांत्रिक समिती गठीत करण्याकरीता नामनिर्देशन केले होते. त्यानुसार गठीत तांत्रिक समितीची बैठक दि. ११/११/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली आणि सदर बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवृत्तात तयार केलेला असून, सदर कार्यवृत्तांत मा. कुलगुरु महोदययांच्या अवलोकनार्थ तथा आदेशार्थ ठेवला असता सदरचा विषय मा. व्यवस्थापन परिषद बैठकीसमोर सादर करण्याचे आदेश पारीत केले आहे. तत्पूर्वी उक्त संदर्भात स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड यांच्याशी पत्रव्यवहार केलेला असून, विद्यापीठाशी MoU करुन सल्लागार सेवा (consultancy) स्वरुपात सॉफ्टवेअर तयार करण्याचे प्रथमदर्शनी मान्य केले व त्या संदर्भात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मा. कुलगुरु महोदयांशी चर्चा करुन पुढील पत्र पाठविण्याचे कळविले आहे.<br>सबब, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) डॅशबोर्ड माहिती व्यवस्थापन (MIS) सॉफ्टवेअर तयार करणेबाबत गठीत तांत्रिक समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांच्या अनुषंगाने MIS सॉफ्टवेअर तयार करण्यासाठी सल्लागार सेवा (Consultancy) स्वरुपात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याशी सामंजस्य करार (MoU) करुन करणे व त्यासाठी होणाऱ्या प्रत्यक्ष खर्च विद्यापीठाच्या अंदाजपत्रकामधुन करण्याची बाब विचारार्थ. | पीएम-उषा विभाग |
| ठराव: | **प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) डॅशबोर्ड माहिती व्यवस्थापन (MIS) सॉफ्टवेअर तयार करणेबाबत गठीत तांत्रिक समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांच्या अनुषंगाने MIS सॉफ्टवेअर तयार करण्यासाठी सल्लागार सेवा (Consultancy) स्वरुपात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याशी सामंजस्य करार (MoU) करणे व त्यासाठी १.५ लाख (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार फक्त) खर्चाची तरतूद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [१५(३)] | श्रीमती पांढरे आश्विनी रामचंद्र, कंत्राटी सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल यांना International Youth Forum मार्फत आयोजित United Nations Conference Centre बँकॉक, थायलंड येथे चौथ्या आंतरराष्ट्रीय युवा मंच मध्ये Sustainable Development Goals (SDGs) and Human Rights या विषयावर भारत देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी गेल्याचा खर्च रु. ३२,०१६.९२/- इतका खर्च विद्यापीठाच्या Research and Development Cell अंतर्गत असलेल्या Financial Assistance for registration fees and traveling allowance for attending national and international seminars for university staff या अंदाजपत्रकीय तरतूदीतुन खर्ची टाकून परतावा देण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: दि. १७/१०/२०२४ रोजी सामाजिकशास्त्रे संकुलाकडून, श्रीमती पांढरे आश्विनी रामचंद्र हया कंत्राटी सहायक प्राध्यापक म्हणून सामाजिकशास्त्रे संकुलातील ग्रामीण विकास या अधिविभागात कार्यरत आहेत. त्यांनी चौथ्या आंतरराष्ट्रीय युवा मंच आणि मानवी हक्क संयुक्त राष्ट्रमार्फत आयोजित United Nations परिषदेत बँकॉक, थायलंड या देशात दि.२२ ते २३ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. सदर आंतरराष्ट्रीय परिषदेत श्रीमती आश्विनी पांढरे यांनी सहभाग नोंदवून भारताचे प्रतिनिधीत्व केले आहे.<br>त्यासाठी विद्यापीठाच्या अंदाजपत्रकीय तरतूदीतून विमान भाडे, नोंदणी शुल्क आणि स्थानिक प्रवास खर्च असे एकूण रु. ३२,०१६.९२ अक्षरी (रुपये बत्तीस हजार सोळा रुपये ब्याण्णव पैसे फक्त) मागणी केली असून, संकुलाकडील वरीलप्रमाणे सादर केलेल्या सादरीकरणावर विद्यापीठाच्या २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये कलम २१ नुसार Research and Development Cell अंतर्गत clause (h) मध्ये Financial Assistance for registration fees and traveling allowance for attending national and international seminars for university staff अंतर्गत रु. १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे असे नमूद असून, या तरतूदीनुसार संबंधितांना झालेल्या एकूण खर्चाचा परतावा मिळावा अशी मांडणी केली आहे. सदर सादरीकरणावर संकुलाच्या संचालकांची आणि Director, Research and Development Cell यांनी स्वाक्षरी केली आहे. तद्नंतर मा. कुलसचिवांकडे मान्यतेसाठी सादर केले असता, त्यांनी Estab section to process, not faculty directly असे पृष्ठांकन केले आहे.<br>सदर पृष्ठांकनानुसार दिलेल्या आदेशान्वये आस्थापना विभागाकडून दि.०६/११/२०२४ रोजी केलेल्या सादरीकरणानुसार प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील विविध संकुलातील नियमित शिक्षकांसाठी राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय कार्यशाळा, चर्चासत्र, परिषदेमध्ये सहभागी वा साधनव्यक्ती म्हणून सादरीकरण करण्यासाठी विद्यापीठाने धोरणात्मक निर्णय घेतले असून, त्यातील नियम खालीलप्रमाणे आहेत:<br>Guidelines for Assistance:<br>1. The faculty member should be permanent staff.<br>2. The faculty member whose work exhibit innovation and novelty, would be accorded preference. | आस्थापना विभाग |

3. The financial support will be provided only for oral/poster presentation at National / International Conference or Workshop.
4. The financial assistance will be provided only once in three years for International conference (abroad) and once in a year for National/International conference or Workshop (India).
5. The acceptance letter from the organizer is mandatory.
6. The first author or corresponding author is only eligible for financial assistance.
7. Financial assistance will be provided after the production of original relevant receipts/ documents.

श्रीमती आश्विनी रामचंद्र पांढरे, सामाजिकशास्त्रे संकुल हया महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ अन्वये शै. वर्ष २०२४-२५ साठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत असल्याने त्यांना वरीलप्रमाणे आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागासाठी आलेला खर्च रु.३२,०१६.९२/- उपरोक्त नमूद नियमावलीप्रमाणे अनुज्ञेय होत नाहीत, असे सादरीकरण करण्यात आले होते. सदर सादरीकरणावर मा. कुलगुरु महोदयांनी Place before upcoming M.C. scheduled on २५/११/२०२४ असे आदेशित केले आहे.

सबब, श्रीमती पांढरे आश्विनी रामचंद्र, कंत्राटी सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल यांना International Youth Forum मार्फत आयोजित United Nations Conference Centre बँकॉक, थायलंड येथे चौथ्या आंतरराष्ट्रीय युवा मंच मध्ये Sustainable Development Goals (SDGs) and Human Rights या विषयावर भारत देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी गेल्याचा खर्च रु.३२,०१६.९२/- इतका खर्च विद्यापीठाच्या Research and Development Cell अंतर्गत असलेल्या Financial Assistance for registration fees and traveling allowance for attending national and international seminars for university staff या अंदाजपत्रकीय तरतूदीतुन खर्ची टाकून परतावा देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव: **श्रीमती पांढरे आश्विनी रामचंद्र, कंत्राटी सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल यांना International Youth Forum मार्फत आयोजित United Nations Conference Centre बँकॉक, थायलंड येथे चौथ्या आंतरराष्ट्रीय युवा मंच मध्ये Sustainable Development Goals (SDGs) and Human Rights या विषयावर भारत देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी गेल्याचा खर्च रु. ३२,०१६.९२/- इतका खर्च विद्यापीठाच्या Research and Development Cell अंतर्गत असलेल्या Financial Assistance for registration fees and traveling allowance for attending national and international seminars for university staff या अंदाजपत्रकीय तरतूदीतुन खर्ची टाकून खर्चाचा परतावा देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**तसेच यासाठी रु.१० लाख इतकी अंदाजपत्रकीय तरतूद करण्यास व भविष्यात आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये विद्यापीठ संकुलातील नियमित / कंत्राटी शिक्षक किंवा प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी सहभागी झाल्यास त्यांना प्रती व्यक्ती रु. १ लाखापर्यंत आर्थिक सहाय्य करण्याचे सर्वाधिकार मा.कुलगुरु महोदयांना देण्यात आले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(४)] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद - राष्टीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराचा मसुदा व इतर शैक्षणिक संस्था व शासकीय संस्थाशी करावयाच्या करारासाठी वापरण्याची बाब मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद - राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांच्यामध्ये ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी मा.कुलगुरु महोदय व एनसील, पुणे यांचे मा.संचालक डॉ.आशिष लेले सर, मा.कुलसचिव योगिनी घारे व इतर सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत करार (MOU) झाला. या सामंजस्य कराराच्या मसुदयाला मा. व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेली होती. या सामंजस्य कराराच्या अंतर्गत विद्यार्थी, शिक्षक, शास्त्रज्ञ यांचे आदान-प्रदान व कॉन्फरन्स, सेमिनार यांचे संयुक्त आयोजन, पब्लिकेशन इत्यादी गोष्टींच्या समावेश आहे.<br>द कलर सोसायटी, मुंबई व एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासोबतही अशा स्वरुपाचा सामंजस्य करार केल्यास विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांकरीता फायदेशीर होईल. यास्तव, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांच्याशी केलेल्या कराराच्या मसुदयाप्रमाणे द कलर सोसायटी, मुंबई व एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासोबत ही याच मसुदयानुसार विद्यापीठाचा सामंजस्य करार करण्याची बाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | प्लेसमेंट सेल |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराच्या मसुद्याप्रमाणे द कलर सोसायटी, मुंबई व एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच अशा प्रकारच्या समकक्ष संस्थाकडून सामंजस्य करारासाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यांचेशी करार करुन व्यवस्थापन परिषदेसमोर माहितीस्तव ठेवण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(५)] | प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी:<br>संदर्भ- १) कुलसचिव कार्यालयाकडील दि. २५, ऑक्टोबर, २०२४ रोजीची अंतर्गत कार्यालयीन टिपणी.<br>२) दि. १६ जानेवारी, २०१९ रोजीचा व्यवस्थापन परिषदेचा ठराव, क्र [११(८)]<br>३) दि. ५/२/२०२४ रोजीची मान्यता.<br>४) दि. ६ फेब्रुवारी, २०२४ रोजीचा व्यवस्थापन परिषदेचा ठराव, क्र [९(०३)]<br>५) दि. ८ नोव्हेंबर, २०२४ रोजीची मान्यता.<br>उपरोक्त संदर्भिय क्र. १ अनव्ये सोलापूर विद्यापीठ शिक्षक (सुटा), सोलापूर यांच्या दि.२५/५/२०२३ आणि २६/१२/२०२३ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाशी संबंधीत विविध प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यासाठी वेळ मिळणेबाबत विनंती केली होती. त्याअनुषंगाने मा.कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षेतेखाली दि.३०/०५/२०२३ आणि दि.१७/१/२०२४ रोजी राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ येथे सुटा संघटनेच्या शिष्ट मंडळासमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.<br>सदरील बैठकीमध्ये संघटनेच्या पत्रात नमूद विद्यापीठाशी संबंधीत विविध प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यात आली. सदरील बैठकीतील कार्यवृतांत सोबत जोडला असून आवश्यक कार्यवाही करणेबाबत कुलसचिव कार्यालयाकडून कळविण्यात आले असून सदरील विभागाशी निगडीत आयत्या वेळेचे विषय क्र.३ खालीलप्रमाणे आहे.<br>Precedence Statute ५४९ नूसार दीक्षांत समारंभासाठी बैठक व्यवस्था करणेबाबत.<br>Precedence Statute ५४९ नूसार दीक्षांत समारंभासाठी बैठक व्यवस्था करताना पदवी प्रदान करणाऱ्या विद्यापरिषद सदस्यांना नियमानूसार व्यासपीठावर उपस्थित राहता येईल. याबाबत आवश्यक तो ठरावातील बदल करण्यात येईल.<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर करण्यात आली होती. त्याअनुषंगाने दि. १६ जानेवारी, २०१९ रोजीचा व्यवस्थापन परिषदेचा ठराव, क्र [११(८)] खालीलप्रमाणे आहे.<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा.व्यवस्थापन परिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावर बैठक व्यवस्था करण्यात यावी व विद्यापरिषद सदस्य यांची मंडपामध्ये अग्रस्थानी (सुरवातीस पहिल्या रांगेत) बैठक व्यवस्था करण्यात यावी असे ठरले. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या १४ व्या दीक्षांत समारंभापासून व्यासपीठावर बैठक व्यवस्था करण्यात येते.

परंतू, दि.०५/०२/२०२४ रोजी १९ व्या दीक्षांत समारंभाची आढावा बैठक मा.कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीमध्ये व्यासपीठावरील बैठकीबाबत व्यासपीठ व बैठक व्यवस्था समितीचे समन्वयक, श्री. अ. बा. जाधव, सहा.कुलसचिव यांनी व्यासपीठावरील बैठकीमध्ये विद्यपरिषद सदस्यांचा समावेश असावा असा मुद्दा उपस्थित केला व त्यानुसार सुकाणु समितीमध्ये चर्चा केली व सदरील चर्चे मध्ये सुकाणू समितीने विद्यापरिषद सदस्य यांची उपरोक्त ठरावानुसार व्यासपीठाखालील मंडपामध्ये अग्रस्थानी (सुरुवातीच्या पहिल्या रांगेत) बैठक व्यवस्था करण्याऐवजी त्यांची बैठक व्यवस्था व्यासपीठावर बैठक व्यवस्थेमध्ये करण्यात येणेबाबत व्यवस्थापन परिषदेमध्ये सदरील विषय विचारार्थ सादर करण्याबाबत तोंडी आदेश दिले होते त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ३ नूसार सदरील विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर केला असता दि. ०६ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये खालील ठराव पारित झाला आहे.

> प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा.व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.विद्यापरिषद सदस्य, व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थे-संदर्भात दि.१६ जानेवारी, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.११(८) प्रमाणे कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा.व्यवस्थापन परिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावर बैठक व्यवस्था करण्यात येते व मा.विद्यापरिषद सदस्य यांची मंडपामध्ये अग्रस्थानी (सुरवातीस पहिल्या रांगेत) बैठक व्यवस्था करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्था प्रचलित पध्दतीने करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(६)] | **दीक्षांत समारंभात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबतची प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशिय सामाजिक संस्था, सोलापूर यांची मागणी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: संदर्भ-<br>१) प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशिय सामाजिक संस्था, सोलापूर यांचेकडील दि.१६ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्राप्त पत्र अवलोकनार्थ सादर.<br>२) दि. १९/०१/२०२४ रोजीची मान्यता.<br>३) इकडील कार्यालयाचे पत्र क्र. जावक.क्र.पुअहोसोविसो/पवमूमं/४४२ दि.१७ फेब्रुवारी, २०२४ रोजीचे श्री.सचिन शिंदे, संस्थापक अध्यक्ष, प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशिय सामाजिक संस्था, सोलापूर यांना देण्यात आलेले पत्र.<br>४) इकडील कार्यालयाचे पत्र क्र.जावक. क्र. पुअहोसोविसो / पवमूमं / ८७७, दि.०८ एप्रिल, २०२४ रोजीचे मा.विभागीय सहसंचालक (उ.शि) सोलापूर विभाग, सोलापूर, ड विभाग, तळमजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर - ४१३००१ यांना देण्यात आलेले पत्र.<br>उपरोक्त संदर्भिय क्र. १ च्या पत्रानुसार प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशिय सामाजिक संस्था, सोलापूर यांनी खालील प्रमाणे निवेदन सादर केले आहे.<br>"संदर्भीय पत्र क्र. १ अनुसरुन भारतीय संविधान बाबतची सखोल माहिती विद्यार्थ्यांना व सर्वसामान्यांना व्हावी आणि त्याबाबतची साक्षरता वाढीस लागावी याबाबत भारतीय संविधानाच्या सन्मानार्थ जनजागृती व्हावी यासाठी विद्यापीठास शिक्षण समारंभ कार्यक्रमास भारतीय संविधान प्रस्ताविकेचे वाचन करुन विश्वरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचा गौरव करण्यात यावा असे संबंधितास आदेश देऊन तसे परिपत्रक काढावे. असे निवेदन देण्यात आले होते. संदर्भिय पत्र क्र. २ नुसार महाराष्ट्र शासनाच्या वतीने भारतीय संविधाना अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शाळा, महाविद्यालय शिक्षण संकूले यांना संविधानाबाबत जनजागृती करण्याचे आदेश देण्यात आले. तरी आपण संदर्भिय पत्र क्र. २ नुसार विद्यापीठ दीक्षांत समारंभ कार्यक्रमात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात यावे ही विनंती.<br>उपरोक्त संदर्भ क्र. ३ च्या पत्रानुसार दीक्षांत समारंभामध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्याबाबत कोणतीही तरतूद नसल्याचे व दि.२६ नोव्हेंबर, हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो व त्या दिवशी संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात येत असलेबाबत इकडील कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/ पवमूमं/४४२ दि.१७ फेब्रुवारी, २०२४ रोजी अन्वये, श्री. सचिन शिंदे, संस्थापक अध्यक्ष, प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशिय सामाजिक संस्था, सोलापूर यांना कळविण्यात आले आहे. तसचे संदर्भ क्र.४ च्या पत्रानूसार मा.विभागीय सहसंचालक (उ.शि), सोलापूर विभाग, सोलापूर, यांना ही सदरील निवेदनाबाबत इकडील कार्यालयाचे पत्र.क्र.जावक.क्र.पुअहोसोविसो/पवमूमं/८७७ दि.०८ एप्रिल, २०२४ अन्वये कळविण्यात आले आहे<br>सबब, दीक्षांत समारंभात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबतची प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशिय सामाजिक संस्था, सोलापूर यांची मागणी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **दीक्षांत समारंभात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबतची प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशिय सामाजिक संस्था, सोलापूर यांची मागणी सर्वानुमत अमान्य करण्यात आली.**<br>**तथापि, दि.२६ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात येणाऱ्या संविधान दिनादिवशी संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(७)] | **सन २०२४-२५ सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी साखळी शिबीराच्या नियोजनाकरिता विद्यापीठ फंडातून तरतूद करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सन २०२४-२५ मधील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत वार्षिक सात दिवसीय विशेष शिबीरांचे आयोजन दि.०१/११/२०२४ ते ३१/०१/२०२५ या कालावधीत करण्यात यावेत असे शासन पत्राव्दारे या विभागास कळविले आहे.<br>सदरील शासन पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सोलापूर शहरातील रासेयो एकक असलेल्या १९ महाविद्यालयांचे दि.१५/०१/२०२५ ते २०/०२/२०२५ या कालावधीत सात दिवसीय निवासी साखळी शिबीर प्रस्तुत विद्यापीठामधील ४८२ एकर परिसरामध्ये घेण्याचा नियोजित आहे. सदरच्या शिबीरामध्ये अंदाजे १२३७ स्वयंसेवक / स्वयंसेविका व ३७ रासेयो कार्यक्रम अधिकारी सहभागी होणार आहेत.<br>सन २०२४-२५ साठी प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांस विद्यापीठाने मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार, महाविद्यालयांकडून प्रत्यक्ष विद्यार्थी नोंदणी केलेल्या संख्येच्या ५०% विद्यार्थी विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये सहभागी करून घेतले जाते. सदरच्या शिबीरासाठी शासनाकडून प्रति विद्यार्थी रक्कम रू.७००/- प्रमाणे अनुदान प्राप्त होते. सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीराकरिता प्राप्त होणा-या अनुदान रक्कमेमधून भोजन व प्रवास खर्च भागवावा लागतो.<br>प्रस्तुत विद्यापीठ परिसरामध्ये आयोजित करण्यात येणा-या सात दिवसीय साखळी निवासी शिबीरामध्ये सहभागी होणा-या अंदाजे १२३७ विद्यार्थी संख्येनुसार प्रति विद्यार्थी रक्कम रू.७००/- प्रमाणे ८,६५,९००/- इतके अनुदान शासनाकडून विद्यापीठास प्राप्त होते. सदरचे प्राप्त झालेले अनुदान संबंधित महाविद्यालयांना शिबीरामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थी संख्येनुसार वितरीत करण्यात येते.<br>उक्त प्रमाणे विद्यापीठ परिसरामध्ये आयोजित करण्यात येणा-या साखळी निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये सहभागी होणारे रासेयो स्वयंसेवक / स्वयंसेविका यांना दोन्ही वेळेचे भोजन-१२०, दोन वेळेचा चहा-१० आणि एक वेळेचा नाष्टा-३० असे एकुण अंदाजे रुपये १६०/- याप्रमाणे प्रति विद्यार्थी प्रति दिवस १६० X ६ = ९६० इतका खर्च होणार आहे. शिबीरामध्ये सहभागी होणारे एकुण अंदाजे १२३७ विद्यार्थी X ९६०=११,८७,५२०/- इतका खर्च खर्च अपेक्षित असून शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदान रकमेपेक्षा रक्कम रू.३,२१,६२०/- इतका वाढीव खर्च होणार आहे. तथापि, सदरच्या शिबीरामध्ये सहभागी होणारे विद्यार्थी संख्या व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांची संख्या विचारात घेता चहा, अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था करण्यासाठी सदरचे शासन अनुदान अपुरे पडणार आहे.<br>तसेच शिबीर कालावधीमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी अंदाजे प्रति दिन २५ जार आवश्यकता असणार आहे. सदरील प्रति नग जार रक्कम रू.२५ याप्रमाणे ३५ दिवसाच्या शिबीर कालावधीसाठी एकुण रक्कम रू.२१,८७५- इतका खर्च अपेक्षित आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसरामध्ये उक्तप्रमाणे आयोजित करण्यात येणा-या शिबीरामध्ये सहभागी होणारे स्वयंसेवक व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांची संख्या विचारात घेता त्यांच्याकरिता चहा, अल्पोपहार भोजनाची व्यवस्था करण्यासाठी अंदाजे अपेक्षित वाढीव खर्च रक्कम रू.३,२१,६२०/- व शिबीर कालावधीसाठी पिण्याचे पाणी जार व्यवस्था करण्यासाठी होणारा अपेक्षित खर्च रक्कम रू.२१,८७५/- असा एकुण रू.३,४३,४९५/- इतका अपेक्षित वाढीव खर्च भागविण्यासाठी एकुण रक्कम रू. ४,००,०००/- इतकी तरतूद विद्यापीठ फंडातून करण्यासाठी सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |
| **ठराव:** | **सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला. तथापि, गरज भासल्यास सदरचा विषय पुनश्च: व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(८)] | **संलग्नता फी संदर्भात सन २०१७-१८ ते २०२२-२३ या सहा वर्षांच्या कालावधीत जमा झालेल्या फी वर १८% GST रक्कम भरणे बाबत निर्णय घेण्याबाबत तज्ञ समितीने दिलेला शिफारस अहवाल विचारार्थ सादर.**<br>टिपणी: याबाबत सादर करण्यात येते की, सहाय्यक आयुक्त, वस्तु व सेवा कार्यालय सोलापूर यांचेकडून प्रस्तुत विद्यापीठास सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत महाविद्यालयांकडून जमा झालेल्या एकूण सलग्नता फीवर १८ % प्रमाणे GST रक्कम व त्यावर व्याज व दंड एकूण रु.१,२४,२८,२८८/- भरणेबाबत वेळोवेळी नोटिसा प्राप्त झालेल्या आहेत. सोबत नोटिसा अवलोकनार्थ जोडलेल्या आहेत. प्राप्त झालेल्या नोटिसांना उत्तर देण्यासाठी मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने CA सुबोध शहा, पुणे यांची तज्ञ सल्लागार म्हणून दि. २१/०५/२०२४ च्या टिपणीद्वारे नामनिर्देशन करण्यात आलेले आहे.<br>CA सुबोध शहा यांनी प्राप्त झालेल्या नोटिसांना वेळोवेळी उत्तर तयार करून दिले असुन ते वेळेत GST कार्यालयाकडे दाखल केलेले आहे. सदर उत्तर GST कार्यालयाकडून नाकारण्यात येउन पुनश्च: Personal Hearing बाबत नोटिसा प्रस्तुत विद्यापीठास दिलेल्या आहेत. त्यामधील सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे Personal Hearing पूर्ण झाले असून विद्यापीठाने सादर केलेले उत्तर GST कार्यालयाकडून नाकारण्यात आलेले आहे व त्यावर Demand Notice रूपये २८,२७,१२० (GST रुपये ९,९६,४००+ व्याज ८,३४,३२०+दंड ९,९६,४००) भरावी अन्यथा उपायुक्त (अपिल) वस्तु व सेवा कार्यालय, सोलापूर यांच्याकडे पुढील अपिल दाखल करावे असे कळविले आहे. उर्वरित पाच वर्षाचे Personal Hearing दि.२५ व २६/११/२०२४ रोजी ठेवण्यात आलेले होते त्याकरिता पुढील तारीख घेण्यात आलेली आहे.<br>दरम्यान दि.११/१०/२०२४ रोजीचे Govt. of India, Ministry of Finance, Dept. of Revenue (Tax Research Unit) यांच्या परिपत्रकानुसार सलग्नता फीवर १८% लागू असल्याबाबत कळविले आहे. त्यामुळे प्राप्त झालेल्या नोटिससंदर्भात अपिल दाखल करणे इत्यादी बाबत पुढील दिशा ठरवून निर्णय घेणे आवश्यक आहे.<br>दि. १५/१०/२०२४ रोजीचे Govt. of India, Ministry of Finance, Dept. of Revenue (Central Board of Indirect Tax and Customs) GST Policy Wing यांच्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीची GST रक्कम एकरकमी भरल्यास दंड व व्याज माफ होणार आहे. | वित्त व लेखा विभाग |

सबब, वरील वस्तुस्थिती विचारात घेता सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालवधीसाठी GST कार्यालय सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या नोटीसीस अनुसरून GST रक्कम अधिक व्याज अशी एकूण रूपये १,२४,२८,२८८/- इतकी रक्कम भरावी लागणार आहे. सदर रक्कम भरणेबाबत अभ्यास करुन दिशा ठरविणे व त्यावर धोरणात्मक निर्णय घेणे याकरिता मा.कुलगुरु यांनी खालीलप्रमाणे तज्ञ समिती नियुक्ती केली आहे.

| अ.क्र. | समिती अध्यक्ष/सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. एल. बी. दामा, प्र-कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ | अध्यक्ष |
| २ | सीए. श्रेणिक एच. शाह, माजी वि. व. लेखा अधिकारी | सदस्य |
| ३ | डॉ. एस. व्ही. शिंदे<br>प्र.अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ४ | सीए. सुबोध शहा, जीएसटी सल्लागार, पुणे | तज्ञ सदस्य |
| ५ | सीए. महादेव एस. खराडे, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य सचिव |

उक्त समितीची दि.२५/११/२०२४ रोजी दु.३:३० मि. बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या नोटीसाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यासंदर्भातील सर्व नियमावली तपासून पुढील निर्णय घेण्यात आले. सोबत तज्ञ समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत अवलोकनार्थ जोडला आहे.

सबब, तज्ञ समितीच्या शिफारस अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यास मान्यता मिळण्याकरिता तज्ञ समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव: **संलग्नता फी संदर्भात सन २०१७-१८ ते २०२२-२३ या सहा वर्षांच्या कालावधीत जमा झालेल्या फी वर १८% GST रक्कम भरणेसाठी निर्णय घेण्याबाबत तज्ञ समितीने दिलेला शिफारस अहवाल स्विकारुन त्यानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [१५(९)] | अभ्यासमंडळे विभागाच्या दि.१४/११/२०२४ रोजीच्या टिपणीमध्ये मा. कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशित केलेल्या समितीने दि.२३ आणि दि.२८/११/२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये अभ्यासमंडळे विभागाकडून दिल्या जाणाऱ्या ०७ रोख रकमेच्या पारितोषिकांमधील राजर्षी शाहू महाराज पुरस्कार आणि कै. आशाताई वसंतराव देशमुख (मार्डीकर) स्मृती पारितोषिक संदर्भात केलेली नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी: दि.१९ जुलै, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.३ व २० नुसार विद्यापीठाकडून दिली जाणारी ५९ सुवर्णपदके आणि ०७ रोख रकमेची पारितोषिके या संदर्भात सर्वकष अभ्यास करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या बैठकीमध्ये करण्यात आलेल्या ठरावानुसार रोख रकमेच्या स्वरुपात दिली जाणारी पारितोषिकांमधील राजर्षी शाहू महाराज पुरस्कार आणि कै. आशाताई वसंतराव देशमुख (मार्डीकर) स्मृती पुरस्कारांसाठी नियमावली तयार करण्यासाठी अभ्यासमंडळे विभागाकडून दि.१४/११/२०२४ रोजीच्या टिपणीमध्ये मा.कुलगुरु महोदयांकडून नामनिर्देशित केलेल्या समितीची बैठक दि.२३ आणि २२८/११/२०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये करण्यात आलेल्या नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | अभ्यासमंडळे विभाग |
| ठराव: | **अभ्यासमंडळे विभागाच्या दि.१४/११/२०२४ रोजीच्या टिपणीमध्ये मा. कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशित केलेल्या समितीने दि.२३ आणि दि.२८/११/२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये अभ्यासमंडळे विभागाकडून दिल्या जाणाऱ्या ०७ रोख रकमेच्या पारितोषिकांमधील राजर्षी शाहू महाराज पुरस्कार आणि कै. आशाताई वसंतराव देशमुख (मार्डीकर) स्मृती पारितोषीक संदर्भात केलेल्या नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(१०)] | **मंद्रुपकर श्रुतीका महेश या विद्यार्थिनीची मार्च २०२३ B.A.II मधील पर्यावरणशास्त्र या विषयाच्या गुणांची संगणक प्रणालीत नोंद घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: डी. बी. एफ. दयानंद महाविद्यालय, सोलापूर यांनी दि.१८/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मंद्रुपकर श्रुतीका महेश या विद्यार्थिनीची मार्च, २०२३ B.A.II मधील पर्यावरणशास्त्र या विषयाला महाविद्यालयाकडून नजरचुकीने Absent नोंदविले गेले असल्याने सोबत जोडल्याप्रमाणे गुणांची नोंद घेण्याबाबत कळविले आहे.<br>याबाबत सादर करण्यात येते की, उपरोक्त विद्यार्थीनीने मार्च, २०२३ मध्ये पर्यावरणशास्त्र या विषयाची परीक्षा दिलेली आहे. परंतु सदरील विद्यार्थीनीचे मार्क महाविद्यालयाने अपलोड न करता महाविद्यालयाकडून नजरचुकीने Absent नोंदविले आहे, असे कळविले आहे. त्यामुळे निकाल Absent असा जाहीर झाला आहे. त्याअनुषंगाने उक्त महाविद्यालयाने दि.१८/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदरील विद्यार्थिनीचे मार्च, २०२३ परीक्षेचे पर्यावरणशास्त्र या विषयाचे सोबत जोडल्याप्रमाणे २८ गुण सादर केले आहेत. सदरचा निकाल मार्च, २०२३ च्या परीक्षेचा असून, सदर परीक्षेचा कालावधी हा सहा महिनेपेक्षा जास्त झाला आहे. त्यामुळे सदरील विषयाचे गुण हे परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बेठकीत ठेवणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थी हित लक्षात घेता, सदर विद्यार्थीनीच्या गुणांची नोंद घ्यावी लागणार आहे.<br>त्यानुसार, सदर प्रकरण सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे असल्याने मंद्रुपकर श्रुतीका महेश या विद्यार्थीनीची B.A. II मधील पर्यावरणशास्त्र या विषयाच्या अध्यादेश O.७ अन्वये २८ गुणांची नोंद घेण्याची बाब दिनांक २७/११/२०२४ रोजीच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला होता.<br>याबाबत परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीत ठराव क्र.३.१ नुसार मंद्रुपकर श्रुतीका महेश या विद्यार्थीनीची मार्च, २०२३ B.A. मधील पर्यावरणशास्त्र या विषयाच्या गुणांची संगणक प्रणालीत नोंद घेण्यात यावी. तथापि, सर्व विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना ऑक्टोबर, २०२४ च्या परीक्षेतील निकालापासून O.७ अंतर्गत बसणाऱ्या वरील प्रकारच्या केसेस ज्या ज्या महाविद्यालयांमध्ये आढळून येतील अशा संबंधित महाविद्यालयांना प्रती विद्यार्थी २,०००/- रुपये दंड आकारण्यासाठीचा विषय व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आला.<br>सबब, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **मंद्रुपकर श्रुतीका महेश या विद्यार्थिनीची मार्च २०२३ B.A.II मधील पर्यावरणशास्त्र या विषयाच्या गुणांची संगणक प्रणालीत नोंद घेण्याबाबत परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या दि.२७/११/२०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.३.१ नुसार केलेली शिफारस सर्वानुमते स्विकारण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(११)] | श्री सिध्देश्वर मंदिर समिती यांचेकडील बाराबंदी पोशाख हा पांढऱ्या रंगाचा असून प्रस्तुत विद्यापीठाचा पोशाखावर विविध रंगाच्या पटटया आहेत. (जसे की, गोल्डन कलर, रेड कलर, कॉफी कलर) त्यामुळे दोन्ही पोशाखामध्ये बरेच साम्य असल्यामुळे विद्यापीठाने प्रचलित पध्दतीप्रमाणे दिक्षांत समारंभामध्ये सदरच पोशाख व त्यावर उपरणे वापरण्यास परवानगी देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे करण्यात आली असल्याची परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.२७ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीतील पारित झालेला ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी: ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी खालील प्रस्ताव मांडला.<br>"आपल्या विद्यापीठातील पदवीदान (convocation) समारंभात पूर्वी सन्मानाने वापरला जाणारे बाराबंदी पोशाख पुन्हा सुरु करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे"<br>सदर ठरावास अनुसरुन विषय क्र. २२ नूसार दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेने पुढील प्रमाणे ठराव पारित केला आहे. "सदरचा प्रस्ताव ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सचिन मारुती गायकवाड व डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."<br>सदरील ठराव व्यवस्थान परिषदेच्या विचारार्थ सादर करण्यात आला असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या पदग्रहण सोहळ्यात बाराबंदीचा वापर होत आहे. हा पोषाख श्री "सिद्धेश्वर" महायात्रेशिवाय कोणीही कधीही परिधान करु नये, असा निर्णय श्री राजशेखर हिरेहब्बु, यात्रेचे मानकरी, नंदिध्वज धारक व भक्तगण यांच्या बैठकीत करण्यात आला आहे, हा पोषाख परिधान करु नये याबाबत ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर महायात्रेचे प्रमुख व पहिल्या नंदीध्वजाचे मानकरी (पुजारी) श्री.राजशेखर हिरेहब्बु यांची मागणी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आली होती. याबाबत निर्णय घेण्यासाठी दि.१७/१०/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. ७ अन्वये खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली होती.<br>१. प्रा. देवानंद चिलवंत - अध्यक्ष<br>२. डॉ. लक्ष्मीकांत दामा - सदस्य<br>३. डॉ. वसंत कांरे - सदस्य<br>४. डॉ. राजशेखर हिरेमठ - सदस्य<br>सदर समिती श्री सिध्देश्वर मंदिर समिती समवेत बैठक घेवून तो अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले होते. त्याअनुषंगाने गठित करण्यात आलेल्या समितीने श्री सिध्देश्वर मंदिर समिती समवेत बैठक घेतली. त्यात बाराबंदी पुरुषांनी वापरावे असे सांगितले त्यामुळे सदर समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने अंतिम निर्णय घेण्यासाठी समितीमध्ये श्रीमती योगिनी घारे, कुलसचिव तथा निमंत्रित सदस्य व डॉ. माया पाटील- सहा. प्राध्यापक, पुअहोसोविसो तथा निमंत्रित सदस्य व डॉ.ए.एस.लावंड- सहा. प्राध्यापक, पुअहोसोविसो तथा निमंत्रित सदस्य यांचे नामनिर्देशन झाले व सदर समितीची प्रथम बैठक मा. प्र कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.०१ जानेवारी, २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सदस्य यांच्या समवेत संपन्न झाली व अंतिम निर्णय घेण्यासाठी द्वितिय बैठक दि.०८ जानेवारी, २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता संपन्न झाली व सदर समिती अध्यक्षांनी व सदस्यांनी चर्चा करुन दीक्षांत समारंभाच्या बाराबंदी पोशाखाबाबत खालील प्रमाणे शिफारस केलेली आहे. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

समिती शिफारस:

१) बाराबंदी पोशाख आगामी १९ व्या दीक्षांत समारंभापासून स्थगित करण्यात येत आहे.
२) व्यासपीठावरील मान्यवर आणि विद्यापीठ प्राधिकरणाचे सदस्य यांना फेटा व उपरणे (सोनेरी कलरचे) तसेच मा.अधिष्ठाता यांना त्यांच्या विद्याशाखनिहाय रंगाचे उपरणे व फेटा वापरण्याची शिफारस करण्यात येते.
३) उपरणेचा तपशिल- लांबी- २.२५ मिटर व रुंदी- ६ इंच तसेच एका बाजुला विद्यापीठाचा लोगो व एका बाजुला अहिल्यादेवींचा फोटो असावा अशी शिफारस सदरील समिती करीत आहे.
४) स्नातकांसाठी विद्याशाखानिहाय उपरणेचा कलर (रंग) वेगवेगळा राहील.
५) व्यासपीठावर पदवी प्रमाणपत्र/सुवर्णपदक स्विकारणाऱ्या विद्यार्थ्यांनी पांढरा पोशाख पारिधान करुन येणे बाबत परीक्षा विभागाने परिपत्रक निर्गमित करावे.

दीक्षांत समारंभाच्या बाराबंदी पोशाखा संदर्भातील गठित समितीचा अहवालाची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात बाराबंदी पोषाख परिधान करु नये, ही ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर महायात्रेचे प्रमुख व पहिल्या नंदीध्वजाचे मानकरी (पुजारी) श्री.राजशेखर हिरेहब्बु यांची मागणी बाबत दि. १७/१०/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. ७ अन्वये गठित समितीचा दि. १२/१/२०२४ रोजी प्राप्त अहवाल दि.१६ जानेवारी, २०२४ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता सदरील बैठकीमध्ये ठराव क्र. २ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित झाला आहे.

"समितीच्या शिफारशी स्विकारण्यात आल्या तसेच सदर शिफारशींमध्ये विद्यापीठ प्रशासनास काही बदल आवश्यक असल्यास त्या बद्दलचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्याचे सर्वानुमते ठरले." ठरावाच्या अनुषंगाने दीक्षांत समारंभात उपरणे वापरण्यात येत आहे.

ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"आपल्या विद्यापीठातील पदवीदान (convocation) समारंभात पूर्वी सन्मानाने वापरला जाणारे बाराबंदी पोशाख पुन्हा सुरु करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे"

सदर ठरावास अनुसरुन विषय क्र. २२ नूसार दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेने खालील प्रमाणे ठराव पारित केला आहे.

> सदरचा प्रस्ताव ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी मांडल्यानंतर त्यास श्री.सचिन मारुती गायकवाड व डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

सबब, श्री सिध्देश्वर मंदिर समिती यांचेकडील बाराबंदी पोशाख हा पांढऱ्या रंगाचा असून प्रस्तुत विद्यापीठाचा पोशाखावर विविध रंगाच्या पटटया आहेत. (जसे की, गोल्डन कलर, रेड कलर, कॉफी कलर) त्यामुळे दोन्ही पोशाखामध्ये बरेच साम्य असल्यामुळे विद्यापीठाने प्रचलित पध्दतीप्रमाणे दिक्षांत समारंभामध्ये सदरच पोशाख व त्यावर उपरणे वापरण्यास परवानगी देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे करण्यात आली असल्याची परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.२७ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीतील पारित झालेला ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव: **दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र. २२ च्या अनुषंगाने दि.२७/१०/२०२४ रोजीच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.३.२ अन्वये केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(१२)] | प्रस्तुत विद्यापीठाच्या राजमाता अहिल्यादेवी होळकर विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये इंटरनेटकरीता LAN चे काम करण्याकरीता या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,२५,००,०००/- (अक्षरी एक कोटी पंचवीस लाख फक्त) GST सह इतक्या रक्कमेस मान्यता देण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठाच्या राजमाता अहिल्यादेवी होळकर विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आले आहे. नजीकच्या काळात सदरच्या इमारतीमध्ये प्रशासकीय विभाग स्थलांतरीत करुन प्रशासकीय काम तेथून करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय कामकाज ऑनलाईन स्वरुपात सुरु आहे.<br>भविष्यात प्रशासकीय सर्व कामे नवीन इमारतीमध्ये होणार असल्याने इमारतीमध्ये इंटरनेटकरीता LAN चे काम करणे आवश्यक आहे. त्याकरीता अंदाजे रु.१,२५,००,०००/- (अक्षरी एक कोटी पंचवीस लाख फक्त) GST सह इतका खर्च अपेक्षित आहे.<br>सबब, विद्यापीठाच्या राजमाता अहिल्यादेवी होळकर विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये इंटरनेटकरीता AN चे काम करण्याकरीता या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु..१,२५,००,०००/- (अक्षरी एक कोटी पंचवीस लाख फक्त) GST सह इतक्या खर्चास, सदरचा खर्च हा Development Part- २ मधील Construction of Admin Building या अंदाजपत्रकीय तरतूदीतून करण्यासाठी मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | सदरचा विषय इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीमध्ये ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(१३)] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या राजमाता अहिल्यादेवी होळकर विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये CCTV बसविण्याकरीता या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.७५,००,०००/- (अक्षरी पंच्याहत्तर लाख फक्त) GST सह इतक्या रक्कमेस मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठाच्या राजमाता अहिल्यादेवी होळकर विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारती बांधकाम पुर्णत्वास आले आहे. सदर इमारतीच्या सुरक्षेच्या दृष्टीने CCTV आवश्यक आहे. सदर कामाकरिता अंदाजे रु.७५,००,०००/- GST सह इतका खर्च अपेक्षित आहे.<br>सबब, विद्यापीठाच्या राजमाता अहिल्यादेवी होळकर विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये CCTV बसविण्याकरीता रु.७५,००,०००/- (अक्षरी पंच्याहत्तर लाख फक्त) GST सह इतक्या खर्चास, सदरचा खर्च हा Development Part- २ मधील Construction of Admin Building या अंदाजपत्रकीय तरतूदीतून करण्यासाठी मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीमध्ये ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(१४)] | प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची प्रवेश व पात्रता शै. वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठामार्फत करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: पात्रता विभागाचे दि.१७/१२/२०२० रोजीच्या टिपणीच्या मान्यतेनुसार विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२०-२१/१००१५, दि.१४/१२/२०२० अन्वये सर्व संलग्नित स्वायत्त महाविद्यालय प्रवेश व पात्रता महाविद्यालयीन स्तरावर करावी. तसेच स्वायत्त महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रतेसंदर्भात विद्यापीठाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नसल्याचे यापूर्वी कळविण्यात आले आहे.<br>तथापि, विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/परीक्षा विभाग/२०२४-२५/११९६, दि.०७/०५/२०२४ रोजीच्या पत्रानुसार, सर्व संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुले यांना शै. वर्ष २०२४-२५ मध्ये सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश व पात्रता नवीन सॉफ्टवेअर मधून करावयाचे आहे असे कळविले आहे. तथापि, स्वायत्त महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रवेक्ष व पात्रता नवीन सॉफ्टवेअर मुधन केलेली नसल्याने दि११/०९/२०२४ रोजीच्या टिपणीने संलग्नता विभागाचा अभिप्राय घेण्यात मान्यता मिळाली होती. त्यानुसार दि.१८/०९/२०२४ अं. का. टि. अन्वये "प्रस्तुत विद्यापीठ संलग्नता विभाग यांनी संलग्नित महाविद्यालयाकडून स्वायत्त मिळणेसंदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर विहित कार्यवाही करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेनंतर संबंधित महाविद्यालयास स्वायत्त देण्यात येते. या कार्यासनाकडून स्वायत्त देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येते. यास्तव महाविद्यालयास प्रवेश व पात्रता विद्यपीठाकडे घेता येईल या बाबतचा अभिप्राया निरंक समजण्यात यावा" असे कळविण्यात आले आहे.<br>सदर अभिप्रायावर विभागाने टिपणी सादर केल असता, सदर टिपणीवर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी विद्यापरिषदेच्या ठरावनुसार डॉ. रोंगे सर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झालेली आहे. त्याचे बैठकीचे पत्र तयार करावे असे निर्देश प्राप्त झाले. तथापि, समितीची ठराव विभागास प्राप्त झाला असता विभागाकडील कर्मचारी यांची सेवा निवडणूक कार्यालयाकडे वर्ग झाल्याने सदर प्रकरणाबाबत कार्यवाही | पात्रता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | प्रलंबित आहे. अद्यापही सदर विभागाचा कर्मचारी निवडणूक कार्यालयाकडून विद्यापीठाकडे वर्ग करण्यात आले नाही. त्यामुळे सदर विभागाचे तात्पुरते कामकाज रोजंदारी कर्मचारीमार्फत करण्यात येत आहे.<br>तथापि, दि.२८/११/२०२४ रोजी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी स्वायत्त महाविद्यालयामध्ये प्रवेश व पात्रता विद्यापीठाच्या सॉफ्टवेअरमधून करण्याबाबतचा विषय दि.२९/११/२०२४ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये सादर करावे असे निर्देश दिले. त्यानुसार सदरचा विषय तयार करण्यात आलेला आहे.<br>सबब, उपरोक्त संदर्भ व मुद्दे विचारात घेता, स्वायत्त महाविद्यालयांची पात्रता विद्यापीठाच्या नवीन सॉफ्टवेअरमधून करावी किंवा दि.२०/१२/२०२० च्या पत्रान्वये महाविद्यालयाने करावी ही बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **विद्यापरिषदेने गठीत केलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरचा विषय फेरसादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५(१५)] | क्रीडा महोत्सव, युवा महोत्सव इत्यादींमध्ये ब्लेझर देण्याची बाब विचारार्थ | विद्यार्थी विकास विभाग / क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | १. विद्यापीठाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा महोत्सव, युवा महोत्सव इत्यादींसारख्या तत्सम कार्यक्रमाच्या आयोजन समिती सदस्यांना ब्लेझर देण्यात येऊ नयेत असे सर्वानुमते ठरले.<br>२. विद्यापीठ क्षेत्र सोडून इतर ठिकाणी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या क्रीडा, सांस्कृतिक संघाच्या मार्गदर्शक / व्यवस्थापक आणि विद्यार्थी यांना ब्लेझर देण्यात यावेत.<br>३. सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांना ब्लेझर देण्यात यावेत. | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद